# SITA ENTERPRISES LIMITED

BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai – 400 001

20-07-2021

Dear Sir,

**Company Code No. 512589**

Copy of Newspaper advertisement of Audited Standalone Financial Results for the Quarter and year ended 31/03/2021

We enclose copies of newspaper advertisement of audited standalone financial results for the quarter and year ended 31st March, 2021 published on 30/06/2021 in:

(a) Standard Post, Mumbai (English).

(b) Lokmanthan, Mumbai (Marathi).

Thanking you,

Yours faithfully,
*For* **Sita Enterprises Limited**

(Ashok Tulsyan)
Whole Time Director

SITA | Registered Office: 415-416, Arun Chambers, 4th Floor, Tardeo Road, Mumbai – 400 034.
Phone / Fax: 6662 7383 – 84, 4971 3666 Email – info@sitaenterprises.com
CIN: L45202MH1982PLC026737

# घरोघरी लसीकरणाच्या राज्याच्या भूमिकेवर मुंबई उच्च न्यायालय नाराज

**मुंबई/प्रतिनिधी** : घराबाहेर पडू न शकणाऱ्या वयोवृद्ध व दिव्यांग व्यक्तींसाठी घरोघरी लसीकरण सुरू करण्यासंदर्भात राज्य सरकार स्पष्ट भूमिका घेत नसल्याने मुंबई उच्च न्यायालयाने दुपारी राज्याचे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांच्या उपस्थितीत जनहित याचिकेवर सुनावणी केली. राज्याच्या भूमिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये घरोघरी लसीकरणाविषयी त्यांची पूर्वसंमती घ्यावी, असे कुठे म्हटले आहे? केरळ, जम्मू-काश्मीरने अशी मोहीम सुरू करताना केंद्र सरकारची परवानगी घेतली होती का? असे प्रश्न मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता व न्या. गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने उपस्थित केले. अत्यंत वयोवृद्ध व अंथरुणाला खिळलेले ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी घरोघरी लसीकरण सुरू करण्याबाबत उच्च न्यायालयातील वकील ॲड. धृती कपाडिया व ॲड. कुणाल तिवारी यांनी जनहित याचिका केली आहे.

केवळ अंथरुणाला खिळलेल्या आणि घराबाहेर पडूच शकत नसलेल्या आणि त्याविषयी त्यांच्यावर उपचार करत असलेल्या किंवा फॅमिली डॉक्टरांचे प्रमाणपत्र असेल तरच त्यांच्यासाठी त्यांच्या घरात जाऊन लस देण्यात येईल. लस दिल्यानंतर संबंधित व्यक्तीवर कोणतेही विपरित परिणाम होणार नाहीत आणि झाल्यास त्यांच्यावर आवश्यक ते उपचार करण्याची जबाबदारी संपूर्णपणे त्यांच्यावर आधीपासून उपचार करणारे डॉक्टर किंवा फॅमिली डॉक्टर यांची असेल. लशीच्या एका कुपीमध्ये दहा डोस असतात. त्यामुळे लस वाया जाऊ नये यासाठी जवळच्याच भागात राहणाऱ्या अशाप्रकारच्या किमान दहा व्यक्ती असणे बंधनकारक आहे, अशी भूमिका राज्य सरकारने घेतली आहे.

ही पद्धत राज्य सरकारने सध्या धोरण म्हणून स्वीकारलेली नाही. मात्र, अशा व्यक्तींना घरोघरी लस देण्याविषयीच्या राज्य सरकारच्या टास्क फोर्सच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग केवळ प्रायोगिक तत्त्वावर ही पद्धत सुरू करण्याचे प्रस्तावित करत आहे. हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला जाणार असून मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर तो केंद्र सरकारच्या मंजुरीसाठी पाठवला जाईल, असेही सार्वजनिक आरोग्य विभागाने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. टास्क फोर्सने बनवलेल्या मार्गदर्शक सूचनांविषयी आम्ही प्रशंसा केली होती. परंतु, आज सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रतिज्ञापत्राने त्याची तीव्रताच कमी केली. राज्य सरकार एक पाऊल मागे गेल्यासारखे आहे. त्यामुळे याचा अभ्यास करून उद्या भूमिका मांडावी, अशी सूचना मुंबईने उच्च न्यायालयाने महाधिवक्तांना केली.



## मुंबई महापालिका तिसऱ्या लाटेसाठी तयार : किशोरी पेडणेकर

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील डेल्टा प्लसची रुग्णसंख्या ७० पर्यंत पोहोचली आहे. कोरोनाची तिसरी लाट आल्यास त्यावर मुंबई महापालिकेने तयारी पूर्ण केली असल्याचे महापौर किशोरी पेडणेकर यांनी म्हंटल आहे. आज घाटकोपर मध्ये वृक्षरोपण करण्याच्या कार्यक्रमाला आल्या असताना त्यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. भाजप नेते आशिष शेलार यांच्यावरही किशोरी पेडणेकर यांनी निशाणा साधला आहे.

मुंबई महापालिकेने तिसऱ्या लाटे संबंधी रुग्णालय तयार असून बेड्स,ऑक्सिजनची सुविधा तसेच लहान मुलांसाठी वेगळी व्यवस्था केली आहे. मुंबईकरही जागृत असून कोरोनाचे नियम पाळत आहेत, असे रस्त्यावरून



जाताना दिसत असल्याचं किशोरी पेडणेकर यांनी म्हंटल.

भाजप नेत्यांनी आता चूप बसावं तुम्ही शांत राहिलात तर सर्वच वाचतील असा टोला आशिष शेलारांनी आज केलेल्या ट्विटवर हाणला आहे

महाराष्ट्र कोरोना विषाणू संसर्गाच्या दुसऱ्या लाटेमधून सावरत असतानाच राज्यावर कोरोनाच्या डेल्टा प्लस वेरियंट संकट उभं राहिलं. राज्यात आतापर्यंत डेल्टा प्लसचे ३४ रुग्ण आढळून आले आहेत. दिलासादायक बाब म्हणजे आतापर्यंत फक्त एका व्यक्तीचा मृत्यू झाला. रत्नागिरी, जळगाव, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डेल्टा प्लसचे रुग्ण बरे झाले आहेत.

व्हायरस काहीही असो, तो नेहमी त्याची अनुवांशिक रचना बदलत राहतो. विषाणू जेव्हा त्याची रचना बदलते, तेव्हा त्याला शास्त्रज्ञ एक नवीन नाव देतात. कोणताही विषाणू त्याचं रुप बदलत असतो. ज्यावेळी लोक विषाणूचा प्रभाव नष्ट करण्यासाठी लस किंवा औषधं घेतात त्यापासून वाचण्यासाठी विषाणूकडून रुप बदलं जातं. मात्र, आपण कायम मास्क वापरणे, हात स्वच्छ ठेवणे, सुरक्षित अंतर ठेवणे या गोष्टी आपल्या हातात आहेत, या गोष्टी केल्यास आपण डेल्टा प्लसपासून बचाव करु शकतो, असं तज्ज्ञांचं मत आहे.

## 'डेल्टा प्लस'बाबत सध्याच्या क्षणाला चिंता करण्याची आवश्यकता नाही- राजेश टोपे

**मुंबई/प्रतिनिधी** : देशात कोरोनाची दुसरी लाट ओसरत दिसत असतानाच कोरोना विषाणूच्या 'डेल्टा प्लस व्हेरिएंट'नं धुमाकूळ घातलेला दिसतोय. कोरोना विषाणूच्या या बदललेल्या स्वरुपामुळे देशाला कोरोना संक्रमणाच्या तिसऱ्या लाटेला सामोरं जावं लागू शकतं. यातच या संदर्भात आज राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी माध्यमांशी बोलताना माहिती दिली.

या क्षणाला डेल्टा प्लसच्या संदर्भात अधिक चिंता करण्याची आवश्यकता नसून आपण सध्या कोरोना नियमांचे पालन करून वागावे, एवढीच माझी सूचना राहिल, असं राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितलं. डेल्टा प्लसच्या गुणधर्माविषयी अद्यापही स्पष्टता आलेली नाही. वेगवेगळे तर्कवितर्क लावले जातात, परंतु आपल्या हाती असलेल्या सध्याच्या



आकडेवारीच्या माहितीप्रमाणे निश्चतच जो एक मृत्यू झालेला आहे. तो केवळ डेल्टा प्लसमुळेच झाला, असं म्हणता येणार नाही, असंही टोपे यांनी म्हटलं. दरम्यान, आरोग्य विभागाला अनेक लोक सहकार्य करताना दिसत नाहीत. त्यामुळे मी अशांना मुद्दाम आपल्या माध्यमातून आवाहन करतो की आपल्यासमोर अधिकाधिक टेस्टिंग आणि लसीकरणाचं आव्हानं आहे. त्यामुळं सर्वांना या टप्पातील निर्बंध लागू आहेत, आता सर्वांनी हे निर्बंध पाळले पाहिजेत. यासाठी प्रशासनानेही याकडे लक्ष देणं गरजेचं आहे, असं मुंबईत पत्रकार परिषदेत बोलताना टोपे म्हणाले.

## एकाच महिलेला तीन वेळेस डोस दिल्याचा आरोप

**ठाणे** : एकीकडे महापालिकेच्या लसीकरण केंद्रावर लसबाबत विचारणा करण्यास गेलेल्या सावरकरनगर येथील वयोवृद्ध व्यक्तीला लस न घेता, लस घेतल्याचे सायंकाळी प्रमाणपत्र मोबाईलवर प्राप्त झाल्याची धक्कादायक बाब ताजी असताना आता ठाण्यातील ब्रह्मांड येथील रुपाली साळी या महिलेला कोरोना लसीचा तिसरा डोस दिल्याची बाब पुढे आली आहे. या संदर्भात भाजपने महापालिकेने त्या महिलेची उपचाराची जबाबदारी घ्यावी असे पत्र महापालिका आयुक्तांना दिले आहे. तर महापालिका प्रशासनाने त्या महिलेला तीन वेळा डोस दिलेला नाही; पण त्या महिलेला तीन वेळा टोचल्याने रिॲक्शन आल्याचे म्हटले आहे. पण त्यांची प्रकृती व्यवस्थित असून महापालिकेचे डॉक्टर त्या महिलेसह तिच्या कुटुंबियांच्या संपर्कात असल्याचे म्हटले आहे.

ठामपाच्या घोडबंदर रोडवरील ब्रह्मांड येथील लसीकरण केंद्रावर रुपाली साळी नामक महिलेला तीन वेळा कोरोना लस दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी भाजपचे गटनेते मनोहर डुंबरे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांनी पत्रव्यवहार करत, साळी नामक महिला कोरोना लसीचे तीन डोस दिल्याप्रकरणी संबंधित महिलेच्या उपचाराची जबाबदारी महापालिकेने घ्यावी असे म्हटले आहे. तसेच तात्काळ त्या महिलेची आरोग्य तपासणी करून उपचाराचा खर्च करावा, त्याचबरोबर भविष्यातील आजारावर उपचार करण्याबाबत जबाबदारी स्वीकारावी. तसेच संबंधित प्रकरणात दोषी असलेल्या आरोग्य कर्मचार्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

### महापालिकेने आरोप फेटाळला



'त्या महिलेला तीन वेळा डोस दिलेला नाही. तीन वेळा सुई टोचले गेल्याने तिला रिॲक्शन झाली आहे. तिच्या कुटुंबियांशी महापालिकेचे डॉक्टर संपर्कात आहेत. आता साळी यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्या तब्येतीकडे डॉक्टर लक्ष ठेवून असल्याने चिंतेचे कारण नाही.

**– संदीप माळवी,**
उपायुक्त, ठामपा.

## संक्षिप्त घडामोडी

### राज ठाकरेंचा लाडका श्वान जेम्सचं निधन



**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचं श्वानप्रेम सर्वांनाच माहिती आहे. अनेकदा फोटोंच्या माध्यमातून त्यांचं हे श्वानप्रेम सर्वांसमोर आलं आहे. दरम्यान राज ठाकरे यांचा लाडका श्वान 'जेम्स' याचं निधन झाल्याने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. राज ठाकरे यांनी आपल्या लाडक्या जेम्सला अखेरचा निरोप दिला असून यावेळी ते भावूक झाल्याचं पहायला मिळालं. राज ठाकरे यांच्यासोबत यावेळी कुटुंबीय तसंच पक्षातील नेते आणि समर्थक उपस्थित होते. राज ठाकरे यांचा श्वान 'जेम्स'चं सोमवारी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास निधन झालं. जेम्स गेल्या अनेक वर्षांपासून राज ठाकरेंसोबत होता. वयोमानानुसार त्याचं निधन झालं असून परळमधील स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान आपल्या लाडक्या जेम्सला अखेरचा निरोप देण्यासाठी राज ठाकरे स्वत: उपस्थित होते. यावेळी जेम्सचं अखेरचं दर्शन घेताना राज ठाकरे भावूक झाल्याचं दिसत होतं. राज ठाकरे आणि 'जेम्स' यांचे फोटो अनेकदा सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या फोटोंमधून राज ठाकरेंना जेम्सचा किती लळा होता हे दिसतं. त्यामुळे आपल्या लाडक्या जेम्सच्या जाण्याने राज ठाकरे भावूक झाल्याचं पहायला मिळालं.

### १४ व्या मजल्यावरून उडी घेऊन मॉडेलची आत्महत्या

मुंबई, २९ जून– कोरोना साथीमुळे चित्रपटसृष्टीलाही मोठा फटका बसला आहे. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या लॉकडाउनमुळे सध्या शूटिंग बंद आहे. नवीन प्रोजेक्ट सुरू होण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. यामुळे अनेक कलाकारांकडे सध्या काम नसल्यानं त्यांना आर्थिक विवंचनेला तोंड द्यावं लागत आहे. त्यातून आत्महत्या करण्याचे प्रकार घडत आहेत. गेल्या काही काळात अभिनय क्षेत्रातील अनेक लहानमोठ्या कलाकारांनी आत्महत्या केली आहे. या यादीत आता नोएडातील प्रिया उर्फ भावना गौतम हिच्या नावाची भर पडली आहे. भावनानं सोमवारी रात्री उशिरा इमारतीच्या १४ व्या मजल्यावरून उडी मारून जीव दिला. ती एक मॉडेल होती. याबाबत एका पोलीस कर्मचाऱ्यानं नाव न सांगण्याच्या अटीवर दिलेल्या माहितीनुसार, 'रविवारी रात्री तिचा बॉयफ्रेंड मुंबईहून आला होता, त्याच्यासोबत तिनं पार्टी केली होती, त्यावरून तिची आई तिला रागावली होती. त्यामुळं भावना नाराज झाली होती. सोमवारी तिनं आत्महत्या करण्याचा विचार बोलून दाखवला होता. त्यावेळी तिच्या आईनं तिला समजावलं होतं; मात्र नंतर अचानक तिनं आत्महत्या केली'. २४ वर्षांची भावना गौतम गेल्या काही वर्षांपासून मुंबईत अभिनय, मॉडेलिंग क्षेत्रात काम करण्यासाठी संघर्ष करत होती, मात्र तिला बराच काळ काहीही काम मिळालेलं नव्हतं. त्यामुळं ती निराश झाली होती. सध्या काम बंद असल्यानं ती काही दिवसांपूर्वी ग्रेटर नोएडात बिसरख पोलिस ठाण्याच्या हद्दीत ग्रेनो वेस्ट भागातील परामाउंट इमोशन्स सोसायटीत राहणाऱ्या आपल्या बहिणीकडे आली होती. तिची बहीण या इमारतीत चौथ्या मजल्यावर राहते.

## मुंबईतील उच्चभ्रू वस्तीमध्ये महागड्या सायकल चोरणाऱ्या टोळीच्या मुख्य सूत्रधाराला अटक



**मुंबई/प्रतिनिधी** : हल्ली बहुतेक जण आपलं आरोग्य जपण्यासाठी आणि शारिरिकरित्या फिट राहण्यासाठी नित्यनेमाने व्यायाम करत आहेत तर काही सायकल चालवत आहेत. ज्यामुळे रस्त्यांवर सायकलीच प्रमाण वाढलं आहे, मात्र अशातच मुंबईतील उच्चभ्रू सोसायटीमध्ये महागड्या सायकल चोरणार्या एका १८ वर्षीय तरुणाला माहिती पोलिसांनी अटक केली आहे.

२२ जून रोजी माहीममध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने त्यांची सायकल चोरी झाल्याची तक्रार माहीम पोलीस ठाण्यात नोंदविली होती. माहिम पोलीस ठाण्याने गुन्हा नोंदवला आणि या प्रकरणाचा तपास सुरू केला. दादर, वरळी, माहीम, शिवाजी पार्क या परिसरा मधील उच्चभ्रू वस्तीमध्ये महागड्या सायकल चोरी करणारी टोळी कार्यरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर सापळा रचला त्यांचे असलेलं खबरी सतर्क केले. पोलिसांच्या या प्रयत्नाला लवकरच यश आलं.

माहिम येथे नयानगरमध्ये प्रेम विजय पाटील (वय १८) हा सायकल विक्री करण्याची बोलणी करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस आणि त्यानुसार सापळा रचला. विजय पाटील त्या ठिकाणी आला आणि पोलिसांच्या तावडीत सापडला पोलिसांनी त्याला अटक करून जेव्हा चौकशी केली तेव्हा सायकल चोरी करणाऱ्या टोळीचा तो मुख्य सूत्रधार निघाला. विजय पाटील आणि त्याच्या साथीदारांवर मुंबईतील माहिम, दादर, शिवाजी पार्क,वरळी अशा विविध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल आहेत.

विजय पाटीलकडून केलेल्या चौकशीतून त्याचे अजून तीन साथीदार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तसेच विजय कडून २४ महागड्या सायकल ही पोलिसांनी जप्त केल्या. विजय पाटील याला २ जुलै पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून त्याच्या इतर तीन साथीदारांचा शोध पोलिसांकडून केला जातो. मुंबई पोलीस उपआयुक्त परिमंडळ पाच प्रणय अशोक यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त माहीम विभाग अरुंधती राणी आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास शिंदे, पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण खराडे, अतुल आव्हाड, पोलीस उपनिरीक्षक योगेश बेंडकुळे, झनक सिंग गुणावत या पथकाद्वारे ही कामगिरी बजावण्यात आली आहे.

## आता पश्चिम रेल्वेवर विरारपर्यंत धावणार १५ डब्यांची लोकल



**मुंबई/प्रतिनिधी** : पश्चिम रेल्वेच्या प्रवाशांसाठी गुड न्यूज आहे. कारण आता पश्चिम रेल्वेच्या अंधेरी ते विरार रेल्वे स्थानकांदरम्यान धीम्या मार्गावर १५ डब्यांची लोकल धावणार आहे. पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पश्चिम रेल्वेच्या केवळ जलग मार्गावर १५ डब्यांची लोकल धावत होती. मात्र आता अंधेरी ते विरार स्थानकादरम्यान धीम्या मार्गावरही १५ डब्यांची लोकल सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. यामुळे लोकलने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या क्षमतेत २५ टक्क्यांनी वाढ होईन असे त्यांनी म्हटले आहे. पश्चिम रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारपासून पश्चिम रेल्वेत नव्या सेवा आल्याने पश्चिम उपनगरीय मार्गावर १५ डब्यांच्या लोकलची एकूण संख्या ७९ झाली आहे. पश्चिम रेल्वेच्या चर्चगेट आणि डहाणू स्टेशन दरम्यान एकूण १ हजार ३६७ उपनगरीय लोकल धावतात.

पश्चिम रेल्वेने १३ डाऊन आणि १२ अप मार्गासोबतच २५ उपनगरीय लोकल सेवांचा १२ डब्यांतून १५ डब्यात बदलल्या आहेत. यात धीम्या मार्गावर धावणाऱ्या १८ लोकल आणि सात उपनगरीय लोकल नेटवर्कच्या जलद मार्गावर धावणार आहेत. एकणू ५० बारा डब्यांच्या लोकलचे १५ डब्याच्या लोकलमध्ये रुपांतर केल्याने लोकलने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा सर्वाधिक फायदा होईल, असे पश्चिम रेल्वेने त्यांच्या परिपत्रकात म्हटले आहे. धीम्या मार्गावर १५ डब्यांच्या लोकलसाठी पश्चिम रेल्वेने अंधेरी ते विरारमधील १४ स्थानकांवर २७ प्लॅटफॉर्मचा विस्तार केला आहे. उपनगरीय लोकलमधील गर्दी कमी करणे हा या मागचा उद्देश असल्याचे पश्चिम रेल्वेने सांगितले आहे.

## बीडीडी चाळ पुनर्विकासात कुणीही बेघर होणार नाही याची काळजी घ्या – मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकासात कुणीही बेघर होणार नाही. चाळीतील प्रत्येकाच्या पुनर्वसनाची काळजी घेतली जाईल. याठिकाणच्या पोलिसांच्या निवासस्थानांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मंत्रीस्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज मंगळवारी दिले. पोलीसांच्या निवासस्थानांबाबत पुनर्विकास आणि पुनवर्सन यांच्या अनुषंगाने आराखडा तयार करण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यानी यावेळी दिल्या.

बीडीडी चाळ पुनर्विकासात पोलिसांना वाटप झालेल्या निवासस्थानातील दिवंगत कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना घरे



उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने या बैठकीत चर्चा झाली. मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले की, बीडीडी चाळ पुनर्विकासात कुणालाही पुनर्वसनापासून वंचित ठेवले जाणार नाही. बीडीडी चाळीचा पुनर्विकास हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्यामुळे तो सुनियोजितपणे पूर्ण होईल असे प्रयत्न आहेत. याठिकाणी पोलीस दलाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या निवासस्थानांपैकी काही निवासस्थाने दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांकडे आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडेही आहेत. पुनर्विकासात पोलिसांच्या सेवा निवासस्थानांची संख्या अबाधित ठेवून, सध्या वास्तव्यास असलेल्या पोलिसांच्या कुटुंबांबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करावा लागेल. त्यांच्यासाठी विविध पर्यायांतून घरे उपलब्ध होतील असे नियोजन करावे लागेल. पुनर्विकासातून म्हाडाच्या माध्यमातून उपलब्ध होणारी घरे आणि त्यांचे या पोलिसांकरिता करावे लागणारे वाटप याबाबत आराखडाही तयार करण्यात यावा.

मंत्रीस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत तसेच पुनर्विकास आणि पुनर्वसन यांच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. मुख्यमंत्र्याच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी बीडीडी चाळ पुनर्विकासाबाबत मुख्यमंत्री ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनुकूमार श्रीवास्तव, मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव मिलिंद म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष अनिल डिग्गीकर यांच्यासह माजी आमदार सचिन अहिर, सुनिल शिंदे, नगरसेवक आशिष चेंबुरकर आदी उपस्थित होते.

**SITA ENTERPRISES LIMITED**
Regd. Office: 415-416, Arun Chambers, Tardeo Road, Mumbai-400034
CIN No.: L45202MH1982PLC026737 Website: www.sitaenterprises.com
**Audited Standalone Financial Results for the Quarter and Year Ended 31.3.2021**
(Rs. in Lakhs)

| Particulars | Quarter ended 31.3.2021 | Year ended 31.3.2021 | Quarter ended 31.3.2020 |
|---|---|---|---|
| Total Income from Operations | 10.26 | 59.51 | 13.02 |
| Net Profit for the period (before Tax,Exceptional and/or Extraordinary items) | 7.92 | 33.40 | 6.89 |
| Net Profit for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 7.92 | 33.40 | 6.89 |
| Net Profit for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 5.52 | 28.00 | 7.81 |
| Total Comprehensive income (after tax) | 5.52 | 28.00 | 7.81 |
| Equity Share Capital | 300.00 | 300.00 | 300.00 |
| Other Equity as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | 751.75 | - |
| Earnings Per Share (of Rs. 10/- each) not annualised (for continuing and discontinued operations) - | | | |
| - Basic : | 0.18 | 0.93 | 0.26 |
| - Diluted : | 0.18 | 0.93 | 0.26 |

Note : The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and the Company's website (www.sitaenterprises.com).

For Sita Enterprises Limited
Ashok Tulsyan
Whole Time Director, DIN : 00353156
Place: Mumbai, Date: 28/06/2021

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, **मुख्य समुह संपादक डॉ. अशोक विठ्ठल सोनवणे,** यांनी शितल प्रिंटर्स, प्लॉट नं. ६०, भूषण नगर, केडगाव देवी, अहमदनगर ४१४००१ (महाराष्ट्र) येथे छापले आहे. ✻ **निवासी संपादक– पदमाकर सुखदेवे, (निवृत्त कार्यकारी अभियंत्ता),** ✻ **वृत्तसंपादक– मुकुंद काकड, मुंबई कार्यालय** – ८७/२, दातार निवास, पहिला माळा, बझारगेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई–४०० ००१, येथून प्रसिद्ध केले. फोन – (०२२) ६६१० ७०८५, ६६६६११५८. RNI : MAHMAR/२०११/४१४४९.
Email : lokmmumbai@gmail.com. (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहिली.

# MDA in endemic district, says Tope

(Standard Post, Bureau)

Nanded, June 30 : The Minister for Public Health and Family Welfare Rajesh Tope, in a video appeal at a virtual 'Media Sensitization Workshop' said, "In a monumental step towards eliminating filariasis, the government is starting the Mass Drug Administration (MDA) in endemic districts of Maharashtra. During MDA, trained health workers will follow COVID-19 appropriate protocols and conduct house-to-house visits to provide free-of-cost anti-filaria medicines to all beneficiaries in all communities in affected areas. These anti-filaria medicines are completely safe and effective", today.

The Directorate of Health & Family Welfare Services, Government of Maharashtra organized a virtual 'Media Sensitization Workshop' to highlight the importance of the Mass Drug Administration (MDA) rounds in eliminating Filariasis and appealed to the media to play a catalytic role in helping increase public awareness.

All the districts have carried out rigorous preparatory activities including training of Drug Administrators and supervisors. The healthcare workers have also been trained on COVID-19 safety protocols to prevent transmission of the disease while administering the anti-filaria drugs during house-to-house visits, added Tope.

The media sensitization workshop was supported by Global Health Strategies (GHS) and Project Concern International (PCI). Dr Nupur Roy, Additional Director, National Vector Borne Disease Control Programme (NVBDCP) , Government of India; Dr. Archana Patil, Director, Health & Family Welfare Services, Filaria, Dr. Sanjeev Jadhav, Additional Director, Health & Family Welfare Services; representatives from Project Concern International and Global Health Strategies and senior media representatives from the state and districts undertaking MDA, participated in the workshop.

During the workshop, Dr Nupur Roy, lauded the state government's efforts to eliminate Filariasis and expressed her faith in all the stakeholders who are working in tandem to fight Filariasis in the state.

Speaking about the state's efforts against Filariasis, Dr Archana Patil said "Covid-19 has taught us that now more than ever, it is crucial we integrate public health programmes at the systemic and ground level. Maharashtra state is committed to ensuring last mile delivery of public health services even during the COVID pandemic and will adopt all necessary innovations to safely deliver essential services under the Lymphatic Filariasis elimination programme."

Dr Sanjeev Jadhav highlighting the importance of the MDA rounds, said "For an MDA round to be successful, it is essential that all households in an endemic area receive and consume the anti-filaria drugs in the presence of the healthcare worker.

This is the only way we can ensure the interruption of transmission of Filariasis within the community, thus enabling elimination of the disease".

# Over 1 cr people benefited from with free 'Shivbhojan Thali' scheme

Aurangabad/Mumbai, June 30 (UNI) : More than one crore people have benefited from the free 'Shivbhojan Thali' scheme for the poor and needy in the state.

According to a statement issued on Tuesday, 1,07,59,090 free plates have been distributed from April 15 onward to June 28,2021.

The period of this scheme has been already extended up to July 14, 2021. Such government order has been issued by the Department of Food and Civil Supplies on June 17.So far total 4,86,95,687 plates have been distributed under Shiv Bhojan Yojana in the state.So far 1,332 Shivbhojan Kendras have been sanctioned in the state of which 1,068 Shivbhojan Kendras presently working in the state and the rest of the centers will start soon,the release added.It may noted that under the welfare scheme, the government is providing free meals to the poor considering the economic hardships faced by the commoners in the COVID times.




Members of LGBT community take selfies after receiving COVID-19 vaccine shot at a vaccination camp organised by a trust for them, in Mumbai on Tuesday.

# RT-PCR test mandatory for Maharashtra State legislators, staff

Mumbai, June 30 (UNI) : The monsoon session of the Maharashtra State Legislative Assembly will be held on July 5 and 6 at Vidhan Bhavan, Mumbai for which RT-PCR test has been made mandatory for all legislators and the concerned staff.

According to a statement, a high level meeting was already held at Vidhan Bhavan to implement the decision taken in the meeting of Vidhan Sabha and Vidhan Parishad Working Advisory Committee.

Honorable members of both the Houses, drivers of their vehicles and fellow passengers coming to Mumbai by vehicle will all be required to undergo RT-PCR test for a valid period dated 3rd or 4th July, 2021 in a recognized lab at a convenient place and keep their report with them for Vidhan Bhavan admission.

RT-PCR testing will be mandatory for those who have received the first or second dose of vaccination, as well as for those who have a positive report of the antibody test for Covid-19.As per previous conventions, in the pavilion near the entrance of Vidhan Bhavan on 3rd and 4th July, 2021 RT-PCR testing facility has been made available free of cost to all concerned.

Although those taking the first or second dose of the Covid-19 vaccine are less likely to become infected, some may be carriers of the corona virus. Therefore, it was stated at the high-level meeting that it was imperative for both the dose takers to undergo RT-PCR testing for the safety of others,the release added.

# Govt to revamp irrigation facilities in Hingoli : Minister

Hingoli, June 30 (UNI) : Water Resources Minister Jayant Patil on Tuesday said that government is committed to eliminate the irrigation backlog of Hingoli district and a fund of 24.78 crores has been allocated for it purpose.

He assured that the funds will not be allowed to fall short.

He was speaking in aDistrict Irrigation Review Meeting w held at collector office.

The meeting was attended by Social Justice Minister Dhananjay Munde, MLA Tanhaji Mutkule, MLA Raju (Chandrakant) Navghare, former Minister Jaiprakash Dandegaonkar, Collector Ruchesh Jayavanshi, Executive Director of Godavari Marathwada Irrigation Development Corporation and other top officials of irrigation department.

Mr Patil said that state governor has declared irrigation backlog of Hingoli district. Therefore, the state government is paying special attention to this district.

He continued that to fill the backlog of deficit in the district, 28.26 MCM of water will be provided to the three dams on the river Purna and below Siddhedhwar Dam, Pota High Level Dam, Jod Parli High Level Dam and Pimpalgaon Kute High Level Dam. It is estimated to cost Rs 494 crore and will benefit an area of about 4,100 hectares.

# Spurned lover acquitted of brutal killing of girlfriend

Thane, June 30 (UNI) : A 32 year old man from New Tadali of Bhiwandi, the spurned lover who was tried for an offence of brutally killing his girl friend aged 17, then has been given the benefit of doubts and acquitted by the district court here on Tuesday.

The District and Sessions Judge HM Patwardhan held that the prosecution has miserably failed to prove the charges under sections 302 and 449 of the IPC against the accused Roopji Sahani, who needs to be set free and hence acquitted him of the charges.

The prosecution told the court that the alleged accused was in love with a girl from the same locality then aged 17 and wanted her to accede to his demands.It was one month prior to the ill-fated incident he stopped her midway and asked her to come with him which she refused.

As a result of the refusal it was in the early hours at around 3.00 a.m. on September 17,2014 while the victim was sleeping in her house along with her sister the accused banged the door and broke it open and trespassed into it.

He questioned as to why the victim refused to accompany him and later dragged her out of the house and after locking the house from outside beat her and stabbed her several times killing her on the spot the court was told.He has also locked a couple of houses in the locality from outside.

# Farmers' outfits meet Ajit Pawar

Aurangabad/Mumbai, June 30 (UNI) : A delegation of farmers and social organizations on Tuesday met Maharashtra Deputy CM Ajit Pawar to discuss the demands and sentiment of the farmers regarding the three union agriculture acts.

The delegation included Swabhimani Shetkari Sanghatana chief former MP Raju Shetty, senior social activists Medhatai Patkar among others.

Revenue Minister Balasaheb Thorat, Cooperation Minister Balasaheb Patil, Agriculture Minister Dadaji Bhuse and other senior officials were also present.

Mr Pawar assured the delegation that the Maha Vikas Aghadi government in the state represents the farmers and will always stand behind the farmers.

The government would not back down in taking steps in the interest of the farmers, he added.

Other dignitaries in the delegation included Pratibha Shinde, S V Jadhav, Ashok Dhawale, Namdev Gawde, Subhash Lomte, Kishore Dhamale, Seema Kulkarni, Subhash Kakaste, Umesh Deshmukh and Shakeel Asmed.

# National Banjara Tigers merge with Congress in Mumbai

Mumbai, June 30 (UNI) : The National Banjara Tigers Association has merged with the Congress party in Mumbai on Tuesday.Atmaram Jadhav, national president of the Association, Madanbhau Jadhav, national working president, along with the office-bearers of the Association joined the Congress party at its head office Tilak Bhavan.

Speaking on the occasion, Maharashtra Pradesh Congress Committee (MPCC) president Nana Patole accused the Bharatiya Janata Party (BJP) of betraying the Dhangar, Maratha and the Banjara communities.He said that during the 2014 Lok Sabha elections, BJP's prime ministerial candidate Narendra Modi had given a written assurance that he would give reservation to the Banjara community after coming to power, but it was not fulfilled till today.Mr Modi has betrayed the Banjara community, he said.The Banjara community gave direction to the state, as they are self-respecting people who work in the national interest, he added.

On this occasion, Mr Patole praised late Vasantrao Naik and Sudhakarrao Naik for their noteworthy contribution to the development of Maharashtra.




Devotees not adhering to social distancing norms, gather outside a temple after further ease in COVID-19 lockdown restrictions, in Aurangabad district on Tuesday.

# Five arrested for 10 thefts

(By Rakesh Sudam Mane)

Palghar, June 30 : With the arrest of five people, the Mira Bhayander Vasai Virar (MBVV) police claimed to have solved 10 cases of thefts and two-wheeler thefts.

Booty worth Rs 10.37 lakh was recovered from the arrested.accused, police said on Tuesday.

All these cases pertained to Valiv police station under Vasai of Palghar district.

The five accused were arrested between June 20 and 26, and in subsequent interrogation, the stolen goods were recovered from them.

The recovery pertains to 10 different offences registered with the Valiv police station.

The arrested accused have been identified as Rajesh Thakur (27), Karan Pradhan (26), Nirmalkant Shirsat (21), Jacky alias Dhansukh Jain (26) and Shiv Kumar Gautam (21, all from Nalla Sopara), sources added.


**SITA ENTERPRISES LIMITED**

Regd. Office: 415-416, Arun Chambers, Tardeo Road, Mumbai-400034

CIN No.: L45202MH1982PLC026737 Website: www.sitaenterprises.com

**Audited Standalone Financial Results for the Quarter and Year Ended 31.3.2021**

(Rs. in Lakhs)

| Particulars | Quarter ended 31.3.2021 | Year ended 31.3.2021 | Quarter ended 31.3.2020 |
|---|---|---|---|
| Total Income from Operations | 10.26 | 59.51 | 13.02 |
| Net Profit for the period (before Tax,Exceptional and/or Extraordinary items) | 7.92 | 33.40 | 6.89 |
| Net Profit for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 7.92 | 33.40 | 6.89 |
| Net Profit for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 5.52 | 28.00 | 7.81 |
| Total Comprehensive income (after tax) | 5.52 | 28.00 | 7.81 |
| Equity Share Capital | 300.00 | 300.00 | 300.00 |
| Other Equity as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | 751.75 | - |
| Earnings Per Share (of Rs. 10/- each) not annualised (for continuing and discontinued operations) - | | | |
| - Basic : | 0.18 | 0.93 | 0.26 |
| - Diluted : | 0.18 | 0.93 | 0.26 |

Note : The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and the Company's website (www.sitaenterprises.com).

For Sita Enterprises Limited
Ashok Tulsyan
Whole Time Director, DIN : 00353156

Place: Mumbai, Date: 28/06/2021



**EAST COAST RAILWAY**

Tender Notice No. eT-HQ-WAT-13-2021, Dt. 28.06.2021

**Name of the Work :** DEVELOPMENT OF PARKS I.E., THEME PARK, WALKING TRACK, CHILDREN PLAY AREA, SITTING ARRANGEMENT AND GARDEN AT (1) JAIL AREA, HARBOUR COLONY, (2) MALAKONDA AND THATICHETLAPALEM COLONY AND CAR PARKING SHED AT ECoRSA STADIUM UNDER THE JURISDICTION OF ASSISTANT DIVISIONAL ENGINEER/ESTATE-I/WALTAIR.

**Approx Cost of the work :** ₹ 45,92,726.83,

Completion period of the work : **04 Months.**

**Tender closing date & time :** at 1330 hrs. of 12.07.2021.

No manual offers sent by Post/Courier/Fax or in person shall be accepted against such e-tenders.

Complete information including e-tender documents of the above e-tender is available in website : **http://www.ireps.gov.in**

**Note :** The prospective tenderers are advised to revisit the website before the date of closing of tender to note any changes/corrigenda issued for this tender.

Divisional Railway Manager (Engg), Waltair

PR-178/M/21-22



**CAN FIN HOMES LTD**

Can Fin Homes Ltd (Sponsor: CANARA BANK) HOME LOANS • DEPOSITS Translating Dreams into Reality

BRANCH OFFICE: # 5-9-100, 1st Floor, Doyen Trade House, Public Garden, Nampally, Hyderabad-500001. Ph: 040-23233385 / 7625079104. E-mail: hyderabad@canfinhomes.com, CIN: L85110KA1987PLC008699

**POSSESSION NOTICE (for immovable property) [(Rule 8(1)]**

The undersigned being the Authorised Officer of **Can Fin Homes Ltd.** under the Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act 2002 and in exercise of the powers under the said Act and Security Interest (Enforcement) Rules, 2002, issued a demand notice on the below mentioned dates calling upon the following borrower(s)/ co-borrowers/guarantors to repay the amount mentioned in the notice with further interest at contractual rates till date of realization within 60 days from the date of receipt of the said notice. The borrowers having failed to repay the amount, notice is hereby given to the borrower and the public in general that the undersigned has taken possession of the property described herein below, against each borrower, in exercise of powers conferred under Section 13(4) of the said Act read with Rule 8 of the Security Interest Enforcement) Rules, 2002 on dates mentioned hereinafter.

| Sl. No. | Name of borrowers and guarantors | Description of the property | Date of Demand Notice | Outstanding amount | Date of possession |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1. Mr. Akber Khan Mohammed 2. Mrs. Ameena Begum 3. Chandra sekhar Kandi (Guarantor) | All that the peace and parcel of the Residential Flat No 501,(West Facing) In Fifth Floor,admeasuring 1460 Sq Ft including common area along with Car Parking Space in the Residential Apartment Complex Known As **"Icon Towers"** Block No-1, together with an Undivided Share of Land admeasuring 58.8 Sq Yards,on Plot Bearing No-190, 191, 192, &193,Block-H, in Part of Sy No 81,82, & 101, Situated at Neknampur Village,and Gram Panchyath, Rajendranagar Mandal, R R District, Hyderabad | 01-04-2021 | 30,87,875/- | 25-06-2021 |
| 2 | 1. Mr. Mohammed Saifullha 2. Mrs.Tahseen Begum 3. Mohd Abdul Jameel (Guarantor) | All that the Peace and Parcel of the Residential Flat No 302, In third floor,property Named as **Al Ameen Tower**,Consisiting of 2 Bed Rooms with a built up area of 1119.00 Sq Ft and Car Parking in the Ground Floor,in House Bearing Municipal No 13-6-436/5/B/14,together with an undivided Share of Land admeasuring 29.61 Sq Yds out of 385 Sq Yds,at Al Ameen Tower, Rock Hills Colony,Khader Bhagh Hyderabad | 01-04-2021 | 41,05,690/- | 25-06-2021 |
| 3 | 1. Mr.Mohd Sohail Ahmed 2. Mrs.Bushra Afreen 3. Mohammed Shakeel Ahmed (Guarantor) | All that the Peace and Parcel of the Residential Flat No 303, in Third Floor,Property Named as **Al Ameen Tower**,Consisiting of 2 Bed Rooms with a built up area of 1000.00 Sq Ft and Car Parking in the Ground Floor,in House Bearing Municipal No 13-6-436/5/B/14,together with an Undivided Share of Land admeasuring 29.61 Sq Yds Out of 385 Sq Yds,at Al Ameen Tower,Rock Hills Colony,Khader Bhagh Hyderabad | 01-04-2021 | 36,33,049/- | 25-06-2021 |
| 4 | 1. Mrs. Masiya Afreen 2. Mrs. Arifa Begum 3. Mohammed Afsar (Guarantor) | All that the Peace and Parcel of the Residential Flat No 301, in Third Floor,property Named as Al Ameen Tower,Consisiting of 2 Bed Rooms with A Built Up Area Of 1000.00 Sq Ft And Car Parking In The Ground Floor,In House Bearing Municipal No 13-6-436/5/B/14,Together With An Undivided Share of Land Admeasuring 29.61 Sq Yds Out Of 385 Sq Yds,At Al Ameen Tower,Rock Hills Colony,Khader Bhagh Hyderabad | 01-04-2021 | 36,28,154/- | 25-06-2021 |

The borrower's attention is invited to provisions of sub-section (8) of section 13 of the Act, in respect of time available, to redeem the secured assets. The borrowers in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of **CFHL** for the amount mentioned against each property along with further interest thereon till the date of realisation.

**Date:29-06-2021,Place: HYD-Nampally** **Sd/-Authorised Officer, Can Fin Homes Ltd.**